# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (समाज कल्याण विभाग)

जा. क्र. 111/सकवि                                                     दिनांक :– 07.06.2018

प्रति,

सहा. आयुक्त,
झोन क्र. 1 ते 10
मनपा,नागपूर

विषय :– दिव्यांग व्यक्तींना वैयक्तिक लाभाच्या योजने अंतर्गत सहायभुत साधने व तत्रंज्ञान खरेदी करण्याकरिता अर्थसहाय्य देण्याबाबत.

संदर्भ :– 1) शासन निर्णय क्र.: अपंग 2015/प्र.क्र.137/वित्त – 3,ग्राम विकास विभाग, दि. 24 नोव्हेबर 2015.

2)शासन निर्णय क्र. संकिर्ण – 2015/प्र. क्र. 118/नवि – 20,नगर विकास विभाग, दि. 28 ऑक्टोंबर 2015.

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाच्या अनुषंगाने, नागपूर महानगरपालिकेमार्फत दिव्यांग व्यक्तीना वैयक्तीक लाभाच्या योजने अंतर्गत सहाय्यभूत साधने व तत्रंज्ञान उपकरने खरेदी करण्याकरिता अर्थसहाय्य देण्याची योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार संदर्भिय शासन निर्णयानुसार पूढीलप्रमाने नमुद बाबीनुसार साधने दिव्यांग व्यक्तींना उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

**अ)** अंध व्यक्तीसाठी :– मोबाईल फोन, लॅपटॉप/संगणक (जॉस सॉप्टवेअर), बेल नोट वेअर, Comunication equipment Braille attachment telephone, adapeted walkers, ब्रेल लेखन साहित्य, ब्रेल टाईपरायटर, टॉकिंग टाईपरायटर, लॉर्ज प्रिंट बुक,अल्पदृष्टी अपंगात्वावर मात करणेसाठी digital magnifiers इत्यादी सहाय्यभूत साधने व उपकरणांकरिता अर्थसहाय्य करणे.

**ब)** कर्णबधीर व्यक्तींसाठी :– विविध प्रकारची वैयक्तीक श्रवणयंत्रे (बीटीईसह) शैक्षणिक संच, संवेदन उपकरणे, संगणकासाठीचे सहाय्यभुत उपकरणे.

**क)** अस्थिव्यंग व्यक्तीसाठी :– कॅलीपर्स, व्हीलचेअर, तीनचाकी सायकल, स्वंयचलित तीनचाकी सायकल ,कुबडया, कृत्रीम अवयव, प्रोस्थोटिक ॲण्ड डिव्हासेस, वॉकर, सर्जीकल फुटवेअर,स्प्लींटस, मोबालिटी एड्स, कमोड चेअर्स, कमोड स्टुल,स्पायनल ॲण्ड नील वॉकी ब्रेस, डिव्हायसेस फॉर डेली लीव्हींग इत्यादी.

**ड)** मतिमंद व्यक्तीसाठी :– मतिमंदासाठी शैक्षणिक साहित्य संच (MR kits), बुध्दीमत्ता चाचणी संच, सहाय्यभूत उपकरणे व साधने तसेच तज्ञाने शिफारस केलेली अन्य सहाय्यभूत साधणे.

**इ)** बहुविकलांग व्यक्तीसाठी :– संबंधित क्षेत्रातील तज्ञाने शिफारस केलेली सुयोग्य सहाय्यभूत साधने व उपकरणे,सी.पी.चेअर, स्वयंचलित सायकल व खुर्ची, संगणक वापरण्यासाठीची सहाय्यभूत उपकरणे.

**फ)** कृष्ठरोग मुक्त अपंग व्यक्ती :– कृष्ठरोगमुक्त अपंगासाठी कुत्रीम अवयव व साधणे, सर्जीकल ॲण्ड करेक्टीव्ह फूटवेअर्स, सर्जीकल अप्लांसेंस, मोबाईलिटि एड इत्यादी.

वरिलप्रमाने सहाय्यभूत साधने व तत्रंज्ञान खरेदी करिता लाभार्थ्याचे पात्रतेचे निकष पूढीलप्रमाने आहे.

१. अर्जदार नागपूर महानगरपालिका हद्दीतील वास्तंव्याचा किमान 03 वर्षाचा पुरावा आवश्यक, त्याकरिता पुराव्यासाठी राशन कार्ड, मतदार ओळखपत्र, घरपट्टीपावती,लाईटबील, टेलीफोन बील, इ. पैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक राहिल. तसेच प्रभागातील मा.नगरसेवक यांचे शिफारीस पत्र आवश्यक राहील.

२. अर्जदारांचे वय किमान 18 वर्ष पुर्ण असलेबाबत वयाचा पुरावा म्हणून जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला/मतदार यादीतील नाव अथवा मतदार ओळखपत्र यापैकी एक पुरावा आवश्यक राहील.

३. महापालिका हद्दीतील 40 टक्के अथवा त्यापेक्षा जास्त अंपगत्व असलेल्या व्यक्तीस या योजनेचा लाभ मिळण्याकरिता अर्ज करता येईल. त्याकरिता अपंगत्वाबाबतचे शासकिय रूग्नालयातील मुळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४. शासकिय व निमशासकिय सेवेत कार्यरत असणाऱ्या दिव्यांगाना तसेच कुटुंबातील एखादी सदस्य (आई,वडील,पती,पत्नी इत्यादी) शासकिय सेवेत असल्यास सदर योजनेचा लाभ मिळणार नाही.

५. कुटुंबात एका पेक्षा जास्त अपंग व्यक्ती असल्यास एका सदस्यालाच सदर योजनेचा लाभ देता येईल.

६. सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या अर्जदाराचे वार्षीक उत्पन्न 1 लाख पर्यंत असने आवश्यक राहील, उत्पन्न त्यापेक्षा जास्त असल्यास सदर योजनेचा लाभ देय राहणार नाही. पुराव्यासाठी अर्जा सोबत उत्पन्नाचा दाखला जोडणे बंधनकारक राहील.

७. सदर योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या अर्जदारांने इतर शासकिय व निमशासकिय सेवेतील योजनेचा लाभ घेतला नसल्याचे तसेच कुटुंबातील सदस्य शासकिय सेवेत नसल्याचे हमीपत्र रू.100/- स्टॅम्प पेपरवर लिखीत स्वरूपात देणे बंधनकारक राहील.

८. सदर योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने स्वतःचे आधार कार्ड अर्जासोबत जोडने तसेच बॅक खाते पासबुकची साक्षांकीत प्रत जोडने आवश्यक राहील.

९. सदर योजनेचा लाभ देणे अथवा न देणे याबाबतचा संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

१०. ज्या दिव्यागांनी नागपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात आलेल्या ई - रिक्षा वाटप योजनेचा लाभ घेतलेला आहे, अशा व्यक्तीना सदर योजनेचा लाभ मिळणार नाही.

उपरोक्त अटि व शर्तीनुसार आपल्या झोन अंतर्गत येणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांचे सोबत जोडलेल्या विहीत नमुण्यात अर्ज भरून परिपूर्ण कागदपत्रासह **साप्ताहिक प्रस्ताव दि. 15 जुलै 2018 पर्यत** समाज कल्याण विभागास सादर करावे, जेणेकरून त्यानुसार अटि व शर्ती प्रमाने लाभार्थ्यांची निवड करून लाभार्थ्यांनी नमुद केलेल्या वस्तुच्या किमतीनुसार प्रस्तावित खर्च निश्चित करून सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेऊन पूढील कार्यवाही विभागास करता येईल.

सोबत संलग्न :- नमुना अर्ज

स.क.अ./उपायुक्त - ।
महानगरपालिका,नागपूर

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

1) मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर
2) मा. अति. आयुक्त (सामान्य), महानगरपालिका, नागपूर

शासन निर्णय क्रमांक : व्हीआयपी – 2016/प्र.क्र.24/वित्त – 3,
दिनांक :– 28 एप्रिल, 2016 चे सहपत्र,
(फक्त वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी लागू)
(लाभार्थ्याकडून भरून घ्यावयाच्या अर्जाचा नमुना)

प्रति,
समाज कल्याण अधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

विषय :– वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी निधी वस्तू/साहीत्य खरेदी केल्यानंतर खाते क्रमांक.................................मध्ये थेट जमा करण्याबाबत.

1) अंपग लाभार्थ्याचे संपूर्ण नाव :–

2) लाभार्थ्याचे अपंगत्वाचे प्रमाण (40%,60%,80%) :–

3) अपंग लाभार्थ्याचे बॅकेचे नाव व शाखेचे नाव :–

4) अपंग लाभार्थ्याचे बैंक खाते क्रमांक (IFS Code सह) :–

5) अपंग लाभार्थ्याचा आधार कार्ड क्रमांक :–

6) शासन निर्णय क्रमांक अपंग 2015/प्र.क्र.137/वित्त–3,दि. 24 नोव्हेंबर, 2015 मधिल "ब"वैयक्तिक लाभाच्या योजनामधून कोणती वस्तु/साहित्य घेवू इच्छितो व त्यामुळे लाभार्थ्याचा काय फायदा होणार आहे.

7) या वस्तू/साहित्याची अंदाजे किंमत :–

8) या वस्तू/साहित्याचे वैशिष्टे (Specification)

9) यापुर्वी वैयक्तिक लाभाच्या योजनेचा लाभ मिळाला आहे का :– होय/नाही

10) लाभ मिळाल्या असल्यास, लाभाचे स्वरूप व योजनेचे नाव :–

11) प्रमाणित करतो की, नागपूर महानगरपालिके मधिल वैयक्तिक लाभाच्या योजनेतून उपरोक्त नमुद साहित्य/वस्तु दोन महिन्याच्या आत खरेदी करून खरेदीच्या पावत्या समाज कल्याण अधिकारी यांना त्वरेने सादर करेन साहीत्य/वस्तु खरेदी केल्यानंतर अनुदानाची रक्कम माझे खाते क्रमांक मध्ये थेट जमा करावे

(स्वाक्षरी)
(संबधित लाभार्थी)